# कार्यालय नगरपरिषद नरखेड तह. नरखेड, जिल्हा नागपुर

E-Mail- mcnarkhed@gmail.com

www.mcnarkhed.org.in Tel. No. : 07105 - 232041


क्र.नपन/सा.प्र.1659/2025 दिनांक: 13/02/2025

## जाहीर सूचना

### "महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश 2015"
### "अधिनियम अंतर्गत विविध लोकसेवा अधिसूचित सेवा देणेबाबत"

सर्व नागरीकांना सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, वाणिज्य संस्था तसेच सर्व राजकीय पक्ष, शासकीय व निमशासकीय कार्यालय तसेच केंद्रीय कार्यालय यांना याद्वारे सूचीत करण्यात येते की, लोकसेवा हमी कायदा अंतर्गत नगर विकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे एकुण 70 सेवांची यादी प्रसिध्द केलेली आहे. तसेच वेळोवेळी नविन लोकसेवा यादी प्रसिध्द करून नगर प्रशासन विभागाला दिली जाते. नरखेड नगरपरिषदेकडुन नागरीकांना देण्यात येणारे सेवांची संख्या 66 इतकी आहे. त्यानुसार सर्व पात्र व्यक्तींना पारदर्शक कार्यक्षम व समायोजित सेवा देण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश 2015 कलम 3 नुसार विविध नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रासह सादर केल्यास नगर परीषद नरखेड कडुन आवश्यक लोकसेवा विहीत मुदतीत दिली जाते. याकरीता नगर परिषद नरखेड तर्फे जनमाहीती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. तरी नगर विकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे विहीत केलेल्या सेवांची यादी नरखेड नगर परिषद नोटीस बोर्डवर व https://mahaulb.in/MahaULB/home/ulblist/viewmore या वेबपोर्टलवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

(अक्षय परदेशी)
मुख्याधिकारी
नगर परिषद नरखेड